**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

१. भारत सर्वच क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती करत असून जगाचं भविष्य घडवण्यासाठी पुढाकार घेत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
२. काँग्रेसची ९६ जागांवरची चर्चा पूर्ण; जागा वाटपावर उद्या महाविकास आघाडीतील इतर पक्षांशी चर्चा करणार असल्याची नाना पटोले यांची माहिती.
३. राज्यात नव्याने स्थापन झालेल्या परिवर्तन महाशक्तीकडून १० उमेदवारांची पहिली यादी जाहीर, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा मतदारसंघातून वामनराव चटप यांना उमेदवारी.
४. देशभरात आज पोलीस स्मृती दिनानिमित्त शहिद पोलिसांना अभिवादन.

---------------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

भारत सर्वच क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती करत असून जगाचं भविष्य घडवण्यासाठी पुढाकार घेत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. एका खासगी माध्यम समूहानं नवी दिल्लीत आयोजित केलेल्या जागतिक शिखर परिषदेला ते संबोधित करत होते. जग अनिश्चिततेच्या गर्तेत असताना भारत आशेचा किरण म्हणून उदयाला आला असं म्हणतानाच मोदी यांनी कोविड, जागतिक अर्थव्यवस्था, महागाई, हवामान बदल, बेरोजगारी आणि युद्ध यांसारख्या जागतिक परिस्थितीच्या भारतावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केला. रालोआ सरकारने तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या सव्वाशे दिवसांत ९ लाख कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

---------------------------------------

**नाना पटोले**

महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, जागा वाटपाची चर्चा सुरु असून ही चर्चा लवकरच पूर्ण होईल. आतापर्यंत काँग्रेसच्या ९६ जागांवरील चर्चा पूर्ण झाली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी उद्या पुन्हा चर्चा केली जाणार आहे. या चर्चेनंतर उद्याच उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा प्रयत्न असेल, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं आहे. दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

म्हणाले की, शिवसेना आघाडीतून बाहेर पडणार या बातम्यात काहीही तथ्य नाही. भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक विरोधी पक्षांबद्दल गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न करत आहे असा आरोप त्यांनी केला.

---------------------------------------

तिसरी आघाडी

राज्यात नव्याने स्थापन झालेली तिसरी आघाडी अर्थात परिवर्तन महाशक्तीकडून १० उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे .यापैकी ८ जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या असल्याची माहिती शेट्टी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू उपस्थित होते. परिवर्तन महाशक्ती आघाडीने अचलपूरमधून बच्चू कडू यांना उमेदवारी दिली आहे .तर रावेरमधून अनिल चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे . याशिवाय चांदवड विधानसभा मतदारसंघातून गणेश निंबाळकर, देगलूर बिलोलीमधून सुभाष साबणे, ऐरोलीमधून अंकुश कदम, हदगाव हिमायतनगरमधून माधव देवसरकर, हिंगोलीमधून गोविंदराव भवर, चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा मधून वामनराव चटप यांना उमेदवारी देण्यात आली आहे .याशिवाय शिरोळ आणि मिरज या दोन जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. या जागांवर उमेदवारांच्या नावाची घोषणा लवकरच केली जाणार आहे.

---------------------------------------

राष्ट्रीय जल पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या 22 ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन इथ आयोजित समारंभात पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण केलं जाणार आहे .जलशक्ती मंत्रालयाच्या अखत्यारीतील जलसंपदा विभाग तसंच नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागानं अलिकडेच 38 विजेत्यांची घोषणा केली होती. यात सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सर्वोत्कृष्ट शाळा अथवा महाविद्यालय, उद्योग क्षेत्र, तसंच सर्वोत्कृष्ट जल वापरकर्ती संघटना, सर्वोत्कृष्ट संस्था आणि सर्वोत्कृष्ट नागरी संस्था अशा एकूण 9 वर्गवारी अंतर्गत विजेत्यांचा समावेश आहे.

---------------------------------------

नोंदी संगणकीकृत

केंद्र सरकारने देशभरातल्या ६ लाख २६ हजार गावांमधल्या जमिनींच्या नोंदी संगणकीकृत केल्या असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. नागरी क्षेत्रातल्या जमिनींचं सर्वेक्षण आणि पुनर्सर्वेक्षण

करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर नवी दिल्ली इथं आयोजित आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला ते संबोधित करत होते. भूसंसाधन विभागाने आतापर्यंत जमिनीच्या मालकी हक्काचे निदर्शक असलले १४ कोटी भू-आधार क्रमांक वितरित केले असल्याचं त्यांनी सांगितलं. नागरी भागातही जिओस्पेशियल तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचं चौहान यांनी सांगितलं. सुरुवातीला १३० शहरांमधे हा प्रयोग राबवला जाणार आहे.

----------------------------------------

नक्षली ठार

भामरागड तालुक्यातील कोपर्शी कोठी जंगल परिसरात आज दुपारी नक्षल्यांसोबत सी 60 पथकाच्या जवानांची चकमक झाली. या चकमकीत पाच ते दहा नक्षली ठार झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. सध्या शोध मोहीम सुरु असल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

----------------------------------------

पोलीस स्मृतीदिन

आज पोलीस स्मृतिदिन. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख इथ चिनी सैन्याचा हल्ला परतवून लावताना दहा पोलीस कॉन्स्टेबल शहीद झाले होते. त्यांच्यासह देशभरातल्या विविध मोहिमांमध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पोलिसांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आजचा दिवस पाळला जातो. या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय पोलीस स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून पोलिसांना अभिवादन केलं. पोलीस स्मृती दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातल्या पोलीसांच्या शौर्य आणि बलिदानाचा गौरव केला आहे. समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये पोलिसांच्या अजोड समर्पणाची त्यांनी प्रशंसा केली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशभरात शहीद झालेल्या पोलिसांच्या स्मृतींना नायगाव पोलीस मुख्यालयातल्या स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विविध देशांचे मुंबईतले वाणिज्यदूत आणि प्रतिनिधी, आणि  वरिष्ठ पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र पोलीस दलानेही समाज माध्यमावरच्या संदेशातून शहीद पोलिसांना अभिवादन केलं आहे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा मान राखत जीवाची पर्वा न करता देशसेवा करणाऱ्या सर्व हुतात्मा पोलिसांना सलाम, असं या संदेशात म्हटलं आहे.

----------------------------------------

तुकडोजी महाराज पुण्यतिथी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा 56वा पुण्यतिथी महोत्सव आज मोझरी इथल्या गुरुदेव नगर इथं साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त सुमारे एक ते दीड लाख भक्तगणांनी समाधीस्थळी दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी मौन श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमादरम्यान होणारी गर्दी पाहता कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीनं राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा वरील वाहतुक व्यवस्थेत एकदिवसीय बदल करण्यात आला आहे. यानुसार अमरावतीकडून तिवसा तालुक्यातील मोझरी - गुरुदेव नगर मार्गे नागपूरकडे जाणारी वाहतूक नांदगाव पेठ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून मोर्शीमार्गे नागपूरकडे वळविण्यात आली आहे.

-------------------------------------

आढावा विधानसभा मतदारसंघांचा’

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

-------------------------------------

आयोडिन कमतरता दिवस

आज जागतिक आयोडिन कमतरता दिवस आहे. चांगल्या आरोग्यासाठी आयोडिनच्या आवश्यकतेबाबत जागरुकता वाढवणं आणि आयोडिनच्या कमतरतेमुळे होणाऱ्या विकारांवर प्रकाश टाकण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आयोडिनच्या कमतरतेमुळे माणसाच्या सर्वांगीण वाढ आणि विकासावर अनेक प्रतिकूल परिणाम होतात. आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे विकार दूर करण्यासाठी सरकारने नॅशनल आयोडीन डेफिशियन्सी डिसऑर्डर कंट्रोल उपक्रम सुरू केला आहे.

-------------------------------------

रस्ता रोको

वाशीम जिल्ह्यातील कारंजा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनला 15 ऑक्टोबर पासून हमीभावा पेक्षा कमी बाजार भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी राज्य शासनाकडे पत्र लिहून तक्रार केली होती. परंतु या पत्राची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे आज संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केलं. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून हलका लाठीमार करण्यात आला.

-------------------------------------

उमेदवारी

भाजपतर्फे काल विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर करण्यात आली. त्यात बुलढाणा जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने तिनही विद्यमान आमदारांना विधानसभेची

उमेदवारी जाहीर केली आहे. जळगाव जामोद मतदारसंघातून डॉ.संजय कुटे, खामगाव मधून विधीज्ञ आकाश फुंडकर आणि चिखलीमधून श्वेता महाले निवडणूक लढवणार आहेत.

-----------------------------------

सोने उच्चांक

सोने आणि चांदीच्या दरानं उच्चांक गाठला आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमसाठीचा दर ७८ हजार ४०० रुपये आहे, तर एक किलो चांदीचा दर ९८ हजार १९० रुपये आहे. आज, देशांतर्गत शेअर बाजारात चांगली खरेदी दिसून येत असून सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांत वाढ नोंदवली गेली. सुरुवातीला निफ्टीने वाढीसह २४,९५० चा टप्पा पार केला तर सेन्सेक्समध्ये ४०० हून अधिक अंकांची वाढ दिसून आली.

-----------------------------------